# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, अ प्रभाग समिती

## सभावृत्तांत कार्यपत्रिका क्रमांक १२

दिनांक : ९/३/२०१६ वेळ : दुपारी १२.०० वा.

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अ प्रभाग समितीची माहे मार्च ची मासिक सभा बुधवार दिनांक ९/३/२०१६ रोजी दुपारी १२.०० वाजतां अ क्षेत्रीय कार्यालयातील " राजमाता जिजाऊ सभागृह " येथे आयोजित करणेत आली होती. सदर सभेस खालील सन्मा. सदस्य/सदस्या उपस्थित होते.

१. मा. काळभोर वैशाली जालिंदर – सभापती
२. मा. बाबर शारदा प्रकाश
३. मा. उल्हास शेट्टी
४. मा. आर.एस.कुमार
५. मा. भारती फरांदे
६. मा. भालेराव प्रतिभा ज्ञानेश्वर
७. मा. सुमन नेटके
८. मा. तरस बाळासाहेब
९. मा. भोंडवे संगिता राजेंद्र
१०. मा. प्रसाद शेट्टी
११. मा. सुजाता टेकवडे
१२. मा. झांबरे सतिश (स्विकृत सदस्य)
१३. मा. कुटे गिरीष (स्विकृत सदस्य)
१४. मा. भोंडवे बेबीनंदा ( स्विकृत सदस्या)

याशिवाय श्री. प्रशांत खांडकेकर, क्षेत्रीय अधिकारी, श्री. फारुक शेख, कार्यकारी अभियंता, स्थापत्य, श्री. मिलींद कपिले- कार्यकारी अभियंता विद्युत, श्रीम.रेखा गाडेकर - प्रशासन अधिकारी तथा सचिव (सभाशाखा), श्री.सुनिल वाघुंडे, श्री.अनिल शिंदे , श्री. संजय भोसले , श्री. बन्सल एच.पी. उपअभियंता स्थापत्य, श्रीमती. मोमीन, उपअभियंता, पाणीपुरवठा, श्री.प्रदीप पुजारी, प्र. कार्यकारी अभियंता- स्थापत्य –झोनिपु, श्री.एम.एम.शिंदे - सहा. आरोग्याधिकारी, श्री. लवटे सुशिलकुमार, कनिष्ठ अभियंता, पाणीपुरवठा, श्री. गेंगजे, कनिष्ठ अभियंता, पाणीपुरवठा, श्री. बेळगावकर , कनिष्ठ अभियंता, नगररचना , श्री. वैद्य एस.आर. कनिष्ठ अभियंता,पाणीपुरवठा, श्रीमती. साळुंके अस्मिता, कनिष्ठ अभियंता स्थापत्य-उद्यान, श्री. अनिल हरिश्चंद्रे सहा.उद्यान निरीक्षक, उद्यान विभाग, श्री. ज्ञानोबा गणपत कांबळे, उद्यान सहाय्यक, उद्यान विभाग, श्री. माळी एस.के. पशुवैद्यकिय आरोग्य निरिक्षक उपस्थित होते.

मा. सभापती यांनी उपस्थित सन्मा. नगरसदस्य, नगरसदस्या व अधिकारी यांचे स्वागत करुन सभा सुरु करणेस अनुमती दिली.

मा. सभापती यांचे परवानगीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आले.

विषय क्रमांक १ : मा. संगिताताई राजेंद्र भोंडवे यांचा दिनांक ९/३/२०१६ रोजीचा प्रस्ताव.
प्रभाग क्रमांक १९ किवळे येथील बस टर्मिनलला मुकाई चौक किवळे बस टर्मिनल असे नामकरण करणेबाबत.

विषय क्रमांक २ : मा. बाळासाहेब तरस यांचा दिनांक ९/३/२०१६ रोजीचा प्रस्ताव.
प्रभाग क्रमांक १८ किवळे येथील भिमाशंकरनगर येथील शेवटच्या बसस्टॉप जवळील चौकास " श्री. छत्रपती शिवाजी महाराज चौक " असे नामकरण करणेबाबत.

विषय क्रमांक ३ : मा. संगिताताई राजेंद्र भोंडवे यांचा दिनांक ९/३/२०१६ रोजीचा प्रस्ताव.
रावेत बीआरटीएस रोडवरती श्री.बबन शं. शेटे यांच्या घरा समोरील नगरसेविका सौ. संगिताताई राजेंद्र भोंडवे यांच्या नामफलका शेजारील चौकास कै. ज्ञानदेव केसू भोंडवे चौक व सोनटक्के वस्ती , स.नं. १२/५ रावेत या ठिकाणी यशवंत नगर, सोनटक्के वस्ती असे नामकरण करणेबाबत.

विषय क्रमांक ४ : मा. सुमन राजेंद्र नेटके यांचा दिनांक ९/३/२०१६ रोजीचा प्रस्ताव.
प्रभाग क्रमांक १८ मधील किवळे येथे पोस्ट ऑफिस साठी जागा मिळणेबाबत.

विषय क्रमांक ५ : मा. सुमन राजेंद्र नेटके यांचा दिनांक ९/३/२०१६ रोजीचा प्रस्ताव.
प्रभाग क्रमांक १८ मधील साईनगर मामुर्डी, गंहुजे रोड यांच्यामधील चौकाला कै. रामचंद्र गेनू राऊत असे नामकरण करणेबाबत.

विषय क्रमांक ६ : मा. वैशाली जालिंदर काळभोर यांचा दिनांक ९/३/२०१६ रोजीचा प्रस्ताव.
प्रभाग क्रमांक २६ , स.नं. ६४ आकुर्डी येथील रस्त्यांचे कै. मारुती बाबुराव काळभोर व दत्तमठ येथील रस्त्यास कै. विलास [ आप्पा] रघुनाथ काळभोर नामकरण करणे व परिसराचे काळभोर इस्टेट असे नामकरण करुन तसा फलक लावणेबाबत.

ठराव क्रमांक : ६५ | विषय क्रमांक : १
दिनांक : ९/३/२०१६ | विभाग : स्थापत्य
सूचक : मा. प्रसाद शेट्टी | अनुमोदक : मा. सुजाता टेकवडे

संदर्भ : मा. प्रसाद शंकर शेट्टी यांचा दिनांक १३/०३/२०१५ रोजीचा प्रस्ताव.

प्रभाग क्रमांक २५ चिंचवड स्टेशन येथील पुणे-मुंबई रस्त्यालगत जगन्नाथ कॉम्पलेक्स हौ.सो.

समोरील ६.०० मीटर रुंद रस्त्यास "हस्तीमल शेठ गादिया मार्ग" असे नामकरण करणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

सदर विषयाचा विचार पुढील सभेच्या वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----

ठराव क्रमांक : ६६ | विषय क्रमांक : २
दिनांक : ९/३/२०१६ | विभाग : स्थापत्य
सूचक : मा.संगिताताई भोंडवे | अनुमोदक : मा. बाळासाहेब तरस

संदर्भ : मा. संगिताताई राजेंद्र भोंडवे यांचा दि. १५/७/२०१५ रोजीचा प्रस्ताव.

प्रभाग क्रमांक १९ किवळे (मुकाई चौक) मधील बस टर्मिनलचे " मुकाई बस टर्मिनल " असे नामकरण करणेबाबत विचार करणे.

सदरचा विषय दप्तरी दाखल करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक : ६७ | विषय क्रमांक : ३
दिनांक : ९/३/२०१६ | विभाग : स्थापत्य
सूचक : मा. संगिताताई भोंडवे | अनुमोदक : मा.सुमनताई नेटके

संदर्भ : मा. संगिताताई राजेंद्र भोंडवे यांचा दि. ९/१२/२०१५ रोजीचा प्रस्ताव.

शुभारंभ कॉलनी, स.नं. (१३१/२ व १३०/१ मधील) यास शुभारंभ कॉलनी असा नामफलक बसवून मिळणेबाबत विचार करणे.

सदर विषयाचा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला

---

**ठराव क्रमांक : ६८** **विषय क्रमांक : ४**

दिनांक : ९/३/२०१६ विभाग : स्थापत्य

सूचक : मा. प्रतिभा भालेराव अनुमोदक : मा.भारती फरांदे

संदर्भ : मा. चारुशीला कुटे यांचा दिनांक १३/१/२०१६ रोजीचा प्रस्ताव.

प्रभाग क्रमांक १५ दत्तवाडी मधील नाना स्मृती मंगल कार्यालया मागील लक्ष्मी प्रोव्हीजन स्टोअर पासून ते चर्च पर्यंतच्या रस्त्याला " कै. गणपतराव ज्ञानदेव चव्हाण " तसेच उत्कर्ष क्लासेस ते सेंट्रल बँक या अंतर्गत रस्त्याला " कै. चंपालाल जैन मार्ग " तसेच विठ्ठल मंदिराच्या डाव्या बाजूने श्रीकृष्णनगर पर्यंत जाणा-या रस्त्यास " कै. संपत उमाजी माने मार्ग " व शंकर मंदिर ते कुटे वृंदावन सो. अंतर्गत असणा-या रस्त्याला " कै. बाळासाहेब रंगनाथ जाधव मार्ग " , आदर्श मित्र मंडळ समोरील रस्त्यास " कै. ह. भ. प. चांगदेव दादा काकडे " आणि विघ्नहर गणेश मंदिर ते दक्षिण मुखी मारुती मंदिर अंतर्गत रस्त्यास " कै. सुषमाताई विनायक जोशी मार्ग " असे नामकरण करणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

सदर विषयाचा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--

ठराव क्रमांक : ६९ विषय क्रमांक : ५

दिनांक : ९/३/२०१६ विभाग : स्थापत्य

सूचक : मा. वैशाली काळभोर अनुमोदक : मा.भारती फरांदे

संदर्भ : मा. नंदा विकास ताकवणे यांचा दिनांक १७/२/०१६ रोजीचा प्रस्ताव.

से. २८ मधील २ चौकांचे नामकरण करणेबाबत.

से. २८ मधील संजय काळे ग्राऊंड शेजारील चौकाचे " एकता चौक " व से. २८ मधील मारुती मंदिर शेजारील आतील चौकाचे " आंबा चौक " असे नामकरण करणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

सदर विषयाचा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक : ७० विषय क्रमांक : ६

दिनांक : ९/३/२०१६ विभाग : स्थापत्य

सूचक : मा. संगिताताई भोंडवे अनुमोदक : मा.बाळासाहेब तरस

संदर्भ : मा. संगिताताई भोंडवे यांचा दिनांक ९/३/२०१६ रोजीचा प्रस्ताव.

प्रभाग क्रमांक१९ मधील किवळे येथील बस टर्मिनलला " मुकाई चौक किवळे बस टर्मिनल" असे नामकरण करणेबाबत विचार करणे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----

ठराव क्रमांक : ७१ विषय क्रमांक : ७

दिनांक : ९/३/२०१६ विभाग : स्थापत्य

सूचक : मा. बाळासाहेब तरस अनुमोदक : मा. सुमन नेटके

संदर्भ : मा. बाळासाहेब तरस यांचा दिनांक ९/३/२०१६ रोजीचा प्रस्ताव..

प्रभाग क्रमांक १८ किवळे भागातील – भिमाशंकरनगर येथील टॉवर शेजारील चौकास " तरस पाटील चौक " व अंतर्गत चार रस्त्यांना " भिमाशंकरनगर कॉलनी नं.१ ते ४ " असे नामकरण करण्यात यावे. व दत्तनगर मधील अंतर्गत चार रस्त्यांना " दत्तनगर कॉलनी नं. १ ते ४ " असे नामकरण करणेत यावे. सभावृत्तांत कायम होण्याची वाट न पाहता कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----

ठराव क्रमांक : ७२ विषय क्रमांक : ८

दिनांक : ९/३/२०१६ विभाग : स्थापत्य

सूचक : मा. संगिताताई भोंडवे अनुमोदक : मा. बाळासाहेब तरस

संदर्भ : मा. संगिताताई भोंडवे यांचा दिनांक ९/३/२०१६ रोजीचा प्रस्ताव.

रावेत बीआरटीएस रोडवरती श्री. बबन शं. शेटे यांच्या घरा समोरील नगरसेविका सौ. संगिताताई राजेंद्र भोंडवे यांच्या नामफलकाशेजारील चौकास " कै. ज्ञानदेव केसू भोंडवे चौक " असे नाव देण्यात यावे. तसेच सोनटक्के वस्ती सर्व्हे १२/५ रावेत या ठिकाणी " यशवंत नगर , सोनटक्के वस्ती " असे नामकरण करणेत यावे.

सदर विषयाचा विचार पुढील सभेची वेळी करणेत यावा.

ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----

ठराव क्रमांक : ७३ विषय क्रमांक : ९

दिनांक : ९/३/२०१६ विभाग : स्थापत्य

सूचक : मा. सुमन नेटके अनुमोदक : मा. संगिताताई भोंडवे

संदर्भ : मा.सुमन राजेंद्र नेटके यांचा दिनांक ९/३/२०१६ रोजीचा प्रस्ताव.

प्रभाग क्रमांक १८ मधील किवळे येथे सध्या ब्रॅन्च पोस्टमास्टर सौ. वंदना वामन लिमये यांच्या वाडयामध्ये पोस्ट ऑफिसचे काम चालू असून त्यांची खूप गेरसोय होत आहे व नागरिकांची ही गैरसोय होत आहे.

प्रभाग क्रमांक १८ मधील किवळे येथील करसंकलन ऑफिस शेजारी मोकळी खोली असून त्या खोलीचा वापर पोस्ट ऑफिससाठी व्हावा. जेणेकरुन गावातील नागरिकांची गैरसोय होणार नाही व त्यांना विविध प्रकारच्या सोयीसुविधा उपलब्ध होतील व त्यातून गावाचा विकास होईल. याबाबत विचार करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----

ठराव क्रमांक : ७४ विषय क्रमांक : १०

दिनांक : ९/३/२०१६ विभाग : स्थापत्य

सूचक : मा. सुमन नेटके अनुमोदक : मा. बाळासाहेब तरस

संदर्भ : मा.सुमन राजेंद्र नेटके यांचा दिनांक ९/३/२०१६ रोजीचा प्रस्ताव.

प्रभाग क्रमांक १८ मधील मामुर्डीगाव सर्व्हे नंबर ३ साईनगर , मामुर्डी, गहुंजे रोड यांच्या मधला चौक या चौकाला " कै. रामचंद्र गेनू राऊत चौक " असे नामकरण करणेबाबत विचार करणे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----

ठराव क्रमांक : ७५ विषय क्रमांक : ११
दिनांक : ९/३/२०१६ विभाग : स्थापत्य
सूचक : मा. वैशाली काळभोर अनुमोदक : मा. सुजाता टेकवडे
संदर्भ : मा.वैशाली काळभोर यांचा दिनांक ९/३/२०१६ रोजीचा प्रस्ताव.

प्रभाग क्रमांक २६ काळभोरनगर येथील स.नं. ६४ आकुर्डी येथील खंडोबा माळ चौक ते परशुराम चौक, रामनगर या रस्त्याचे " कै. मारुती बाबुराव काळभोर मार्ग " असे नामकरण करणे, तसेच या रोड पासून दत्त मठ स.नं. ६४ या मार्गास " कै. विलास (आप्पा) रघुनाथ काळभोर " असे नामकरण करणे तसेच सदर परिसरास " काळभोर इस्टेट " नामकरण करुन नामफलक बसविणेबाबत विचार करणे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपलेचे जाहीर केले.

सही/-
(सौ.वैशाली जालिंदर काळभोर)
सभापती
अ प्रभाग समिती

क्र. अक्षेका /११/कावि/१४७/२०१६
दिनांक : ३१ /०३/२०१६

सही/-
प्रशासन अधिकारी तथा
सचिव (सभाशाखा)
अ प्रभाग समिती